REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० | पुणें, बुधवार, तारीख २३ ऑगस्ट, १९४४ | अंक ३४



कांहो धुंडितां देऊळी ?
देव हृदयाच्या राउळी !
* * * *
पांडुरंग पंढरपुरांत नसून तो भक्ताच्या
हृदयांत असतो हेंच
सांवतानें सांगितलें !

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

प्रोड्यूसरः—
व्ही. शांताराम.
दिग्दर्शकः—
केशवराव दाते.

**भक्तीचा मळा** (माली)

भूमिकाः— ● मास्तर कृष्णराव ● बेबी नलिनी ● अमीर कर्नाटकी ● अर्माना ● सामंत ● राजा पंडित

**—: ३ रा आठवडा ! :—**

**डेक्कन**— रोज ४, ७, १०
तिन्ही खेळ मराठी

अपॉलोमध्यें दररोज फक्त १ च खेळ रात्रौ ११ वा.
मराठी बोलपट भक्तीचा मळा

सकाळीं १० ते १२ डेक्कनमध्यें वरच्या दर्जाचीं तिकिटें अगाऊ रिझर्व्ह केलीं जातील. ——कॉम्प्लिमेंटरी व फ्री पास अजिबात बंद.—

गिरगांव
मुंबई नं. ४

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें

संकलनात्मक अभिनव मासिक

# महाद्वार

## ऑगस्ट अंकांत

श्री. शं. वा. किर्लोस्कर यांचा परिचय, अमेरिकन माणसाच्या चष्म्यांतून, बगदाद शहरांत इ. सुंदर लेख, गोष्टी, कविता व बहारीचें संकलित साहित्य ! वार्षिक वर्गणी रु. ६ पाठवून आजच वर्गणीदार व्हा !

किरकोळ अंक दहा आणे

-:महाद्वार कार्यालय, कोल्हापूर:-

## जाहिरात

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

## भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची सत्ताविसावी वार्षिक सधारण सभा रविवार तारीख १०-९-१९४४ रोजीं सकाळीं ९ वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. त्यावेळीं, बँकेचा सन १९४३।४४ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व व्हाइस चेअरमन यांची निवडणूक, पोट-नियम दुरुस्ती वगैरे कामें केलीं जातील.

डायरेक्टर्सच्या निवडणुकीबाबत मत-नोंदणीची वेळ सकाळीं ९-३० ते १-३० अशी आहे.

तरी सदर वेळीं सभासदांनीं येण्याचें करावें अशी विनंति आहे.

म. वि. खंडकर,
मॅनेजिंग डायरेक्टर

कराड, ता. १९।८।४४.

# विविध माहिती

### ब्रिटिश मोटारींच्या निर्गतीची पूर्व तयारी

ब्रिटिश मोटारीच्या धंद्याच्या प्रातिनिधिक संस्थेनें केपटौन, मुंबई, ओटावा, वेलिंग्टन व सिडने येथें आपल्या कचेऱ्या उघडल्या आहेत. इजिप्त, पॅलेस्टाइन, सिरिया, इराक, इराण, इत्यादि देशांसाठी कैरो येथें एक कचेरी लवकरच स्थापन केली जाईल. युद्धसमाप्तीनंतर ह्या देशांत बऱ्याच मोठ्या घडामोडी होणार आहेत, अशी अपेक्षा आहे. युद्ध संपतांच ब्रिटिश निर्गतीस तात्काळ प्रारंभ व्हावा, अशी तयारी चालू आहे.

### शेती आधी, कीं कारखाने आधी ?

नॅशनल बँक ऑफ इंडिया लि. ची वार्षिक सभा लंडन येथें नुकतीच भरली होती, त्यावेळीं बँकेचे अध्यक्ष, मि. लँगफर्ड जेम्स हे म्हणाले,— "हिंदी औद्योगिक प्रगतीस विस्तृत नियोजनानें आणखी गति द्यावी काय, हा मतभेदाचा प्रश्न आहे. तथापि इतर सर्व नियोजनापेक्षा शेतीच्या विस्ताराचें अगत्य जास्त आहे व धान्य परिस्थिति कायमची सुधारेल अशी व्यवस्था अगोदर झाली पाहिजे, हें उघड आहे. नवीन धंदे व कारखाने काढणें श्रेयस्कर असलें तरी त्यांत काम करण्यासाठी सशक्त व सकस मजुरांचा पुरेसा पुरवठा नसेल, तर उपयोग काय ?"

### हुंड्याच्या हावसेनें लक्षाधीशाच्या पुत्राचें दुष्कृत्य

पाल आणि दयावती ह्यांचा मेल्या १ ऑक्टोबरमध्यें विवाह झाला. पाल आणि त्याच्या कुटुंबांतील लोक हे पत्नीच्या हुंड्यावर संतुष्ट नव्हते. दयावतीच्या आईबापांनीं पालला रेडिओसेट घेण्यासाठी ९०० रुपये द्यावेत, अशी त्यांची मागणी होती. हुंड्यांत रेडिओसेट मिळाला नाहीं, म्हणून पालची त्याचे मित्र कुचेष्टा करीत असत. "माझे आईबाप श्रीमान् नसले, तरी पुढच्या सणाचे वेळीं ते कांहींतरी बक्षीस देतील," असें दयावती म्हणे. पाल एवढ्यानें संतुष्ट झाला नाहीं व "मी तुझ्यापेक्षा चांगल्या दिसणाऱ्या आधुनिक तरुणीशीं विवाह करीन" असें म्हणून तो दयावतीस त्रास देऊं लागला. १२ नोव्हेंबर रोजीं सकाळीं त्यांना विमानाची घरघर ऐकूं आली व विमान बघण्यासाठी पालनें दयावतीस घराच्या छपरावर नेलें. विमान बघण्यासाठी ती डोळे ताणून बघत असतां पालनें तिला ढकललें तशी ती खाली पडली व तिला जबर दुखापत झाली. तिला इस्पितळांत पोचविण्यांत आलें. पोलिसांना ही हकीकत कळली परंतु मध्यंतरी पाल बेपत्ता झाला. कांहीं दिवसांनी तो पोलिसास आपण होऊन स्वाधीन झाला व त्यास ७ वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंड अशी दयावतीच्या खुनाचे प्रयत्नाबद्दल लुधियाना कोर्टांत शिक्षा झाली. लाहोर हायकोर्टानें सर्व गोष्टी विचारांत घेऊन ती शिक्षा ३ वर्षे कारागृहवास व २ हजार रुपये दंड अशी उतरविण्यांत आली. हा दंड वसूल झाल्यास निम्मी रक्कम दयावतीस द्यावी, असें हायकोर्टानें सांगितलें. आरोपी बिपिनचंद्र पाल हा एका लक्षाधीशाचा मुलगा आहे. सध्या मध्यम वर्गीय लोकांतील तरुण लोक भरमसाट हुंडा मागतात व तो मिळाला नाहीं म्हणजे त्यांची सारखी तक्रार चालू असते, ही गोष्ट नजरेआड करतां येत नाहीं, असें न्यायमूर्तीनें उद्गार काढले.

### कामगारांचा काळा बाजार थांबविणार

कांहीं लोक आपल्या नोकरांना खासगी कामांसाठी जास्त पगार देऊं करतात, त्यामुळें पब्लिक वर्क्स खातें, लष्करी खातें, रेल्वेज, पोर्ट ट्रस्ट, इत्यादींच्या कामांत आडथळा येतो, असें सिंधमध्यें आढळून आलें आहे. त्याकरितां सिंध प्रांताच्या लेबर सप्लाय कमिटीनें कामगारांच्या वेतनाचे कमाल दर ठरवून टाकले आहेत.

### दुधाचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

हिंदुस्थानांत दरसाल ८० कोटि मण दूध निघतें. अमेरिकेखेरीज दुसऱ्या कोणत्याहि देशांत इतकें दूध निघत नाहीं. असें असूनहि, अमेरिकेंत प्रत्येक माणसाचे वांट्यास दररोज ३५ औंस दूध येतें; हिंदुस्थानांत तें ७ औंसच फक्त येतें. हिंदुस्थानांतील दुधाचें उत्पादन लक्षांत घेतां, दर जनावर सालिना ६२५ पौंड दूध देतें, असा हिशोब होतो. कॅनडा, अमेरिका, इंग्लंड, इत्यादि ठिकाणीं हें प्रमाण ३,५०० ते ४००० पौंड आहे. डेन्मार्कमध्यें प्रत्येक गाय सरासरीनें ८,००० पौंड दूध देतें. हिंदुस्थानांतील गाईम्हशींची संख्या तिप्पट केली, तर येथील जनतेस कमींत कमी आवश्यक दूध पुरूं शकेल. परंतु सध्यांच्या जनावरांसच पुरेसा चारा मिळूं शकत नाहीं, तर तिप्पट जनावरांना पोटभर खावयास कोठून मिळणार ? जनावरास लागणारें अन्न ज्यास्त पैदास केलें पाहिजे व आहेत तितक्याच जनावरांपासून अधिक दूध मिळण्याची शक्यता निर्माण केली पाहिजे; नुसतीं दुभतीं जनावरें वाढवून भागणार नाहीं.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... २६६ |
| २ खेडेगांवी जीवन सुधारण्याची योजना | ... २६७ |
| ३ मोर स्टेट बँक लि. | ... २६८ |
| ४ स्फुट विचार | ... २६९ |
| विश्वविद्यालयांचें ध्येय—शिक्षण आणि व्यावहारिक जीवन—हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न—सर्व आघाड्यांवर शत्रूची पीछेहाट—धंदेवाले, शास्त्रीय संशोधन व मुं. विश्वविद्यालय—बँक ऑफ सिटिझन्स लि. | |
| ५ इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज | ... २७१ |


# अर्थ

बुधवार, ता. २३ ऑगस्ट, १९४४

## खेडेगावी जीवन सुधारण्याची मुंबई सरकारची युद्धोत्तर योजना

मुंबई प्रांताच्या लोकांची आर्थिक स्थिति सुधारावी व त्याबरोबरच युद्धांत भाग घेऊन परत येणाऱ्या सैनिकांची पोटापाण्याची शाश्वत सोय व्हावी, ह्या दृष्टीनें मुंबई सरकारनें युद्धोत्तर योजनेचा एक पंधरा वर्षांचा कार्यक्रम आखला आहे. औद्योगिक प्रगतीचा प्रश्न मध्यवर्ती सरकारच्या नियोजनावरच मुख्यतः अवलंबून असल्यानें, मुंबई सरकारनें आपल्या योजनेंत बिगर-औद्योगिक खेडेगावी सुधारणेकडेच मुख्यतः लक्ष पुरविलेलें आहे. खेडेगावी जीवनामध्यें सर्वांगीण सुधारणा घडवून आणणें हें तिचें उद्दिष्ट आहे व तें नीट साध्य व्हावें, ह्याकरितां पंधरा वर्षांच्या योजनेचे प्रत्येकी पांच वर्षांचें असे तीन भाग करण्यांत आलेले आहेत. सबंद प्रांतामध्यें एकदम सुधारणांस प्रारंभ करणें अव्यवहार्य असल्याकारणानें, कार्यक्रमाची आखणी करतांना योजनांचें चार गट पाडण्यांत आलेले आहेत. ( १ ) कांहीं योजना तातडीनें अंमलांत आणाव्या लागतील, ( २ ) कांहीं योजनांमध्यें सर्व जिल्ह्यांचा समावेश करून विशेष प्रगतीचें बीज आतांच पेरावें लागेल, ( ३ ) कांहीं योजना विशिष्ट परिस्थितीसाठीच असल्यानें त्या विशिष्ट विभागांतच चालू करणें सोईचें होईल व ( ४ ) कांहीं ठिकाणीं सर्वांगीण प्रगतीसाठी खास प्रयत्न केले जातील. सर्वांगीण प्रगतीचें काम ज्या क्षेत्रांत हातीं घेण्यांत येईल, तेथील परिस्थिति इतकी सुधारली पाहिजे, कीं आजुबाजूच्या ठिकाणच्या लोकांना हेवा वाटून प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचा विचार त्यांचे मनांत येऊं लागला पाहिजे, असा हेतु आहे. पहिल्या पांच वर्षांत खालील नऊ जिल्ह्यांतील क्षेत्रांत अशी परिस्थिति निर्माण करण्याचा सरकारचा मानस आहे:—

| जिल्हा | तालुके व पेटे |
|---|---|
| सातारा | सर्व ता. |
| पुणें | इंद्रापूर ता., दौंड व शिरूर पे. |
| सोलापूर | करमाळें, सांगोला, माळशिरस व पंढरपूर ता. |
| अहमदनगर | नेवासें, कोपरगांव, राहुरी, अहमदनगर, पारनेर व श्रीगोंदे ता. व कर्जत पेटा |
| कुलाबा | महाड, माणगांव व रोहें ता. |
| रत्नागिरी | वेंगुर्ला पटाखेरीज बाकी सर्व जिल्हा |
| बेळगांव | सर्व ता. |
| विजापूर | सर्व ता. |
| सुरत | सर्व ता. |

हे जिल्हे व तालुके निवडतांना ( १ ) सर्व प्रांतभर प्रयोग व्हावा, ( २ ) दुष्काळी, निकृष्ट जमिनीच्या व मागसलेल्या विभागांकडे विशेष लक्ष दिलें जावें आणि ( ३ ) रिक्रूट भरतीच्या क्षेत्रांपैकीं कोठलेंहि क्षेत्र वगळलें जाऊं नये, कारण सैनिकासाठी केलेल्या प्रगतीच्या प्रयत्नांचा फायदा त्यांच्या कुटुंबास मिळतो व अशा कुटुंबांची प्रगति झाली म्हणजे सबंध खेडें सुधारतें, अशा तीन मुद्यांवर भर देण्यांत आलेला आहे. ज्या जिल्ह्यांत दरहजारी किमान पांच तरी रिक्रूट भरती झालेली आहे, असे जिल्हे म्हणजे सातारा, पुणें, सोलापूर, अहमदनगर, कुलाबा, रत्नागिरी व बेळगांव हे होत. अहमदनगर, सोलापूर, विजापूर, पुणें, सातारा व धारवाड जिल्ह्यांचा पूर्व भाग हे दुष्काळी मुलूख आहेत. तेव्हां त्या विभागांपैकीं अहमदनगर, सोलापूर, पुणें व सातारा ह्यांस दुष्काळ व रिक्रूट भरतीची संख्या हीं दोन्हीं कारणें लागू पडतात. बाकीच्या विभागांची निवड ही त्यांच्या दुष्काळी परिस्थितीमुळेंच झालेली आहे.

वर सांगितलेल्या नऊ जिल्ह्यांतील मुलुखांत तात्काळ करावयाच्या प्रगतीसाठी तज्ज्ञ कामगारांचा फार मोठा पुरवठा तयार करावा लागेल. एकट्या शेतकी खात्याच्या कामासाठीच किमान ३,००० वरिष्ट नोकरांची जरूरी भासेल. त्यांची पूर्वतयारी आजपासूनच करावयास हवी, कारण शिकून तयार झालेली माणसें एकदम मिळूं शकत नाहींत. पुणें येथील शेतकी कॉलेजांत दरसाल १०० ऐवजी १५० नवे विद्यार्थी घेणें, मांजरी ट्रेनिंग सेंटरमधील डिप्लोमाचे विद्यार्थी वाढविणें, विजापूर व सोलापूर येथें शिक्षण केंद्रें स्थापणें, सहकारी व वैद्यकीय शिक्षणाचीं केंद्रें वाढविणें, इंजिनिअरिंग व व्हि. ज्यु. टे. इन्स्टिट्यूटमध्यें आणखी विद्यार्थ्यांची सोय करणें, प्राथमिक शिक्षकांच्या शिक्षणाची व्यवस्था वाढविणें, पशुवैद्यकांच्या शिक्षणासाठी आणखी सवलती देणें, इत्यादि मार्गांनीं आघाडीवरचे नेते तयार करून आर्थिक उद्धाराची पूर्वतयारी आजपासूनच करावयाची आहे.

आर्थिक उद्धाराच्या योजना हातीं घेण्यासाठी लागणारा नोकरवर्ग शिकवून तयार करण्याचें काम पुरें झाल्यावर, पुढील सुधारणेस उपयोगी पडतील अशा मूलग्राही योजना हातीं घेणें ही पुढची पायरी आहे. शेतीविषयक उपक्रमांस, अर्थातच, त्यांत प्राधान्य दिलेलें आहे. सबंद प्रांत जाण्यायेण्यास खुला करण्यासाठी वहातुकीचे मार्ग तयार करण्याचें महत्त्व ह्यासंबंधांत विशेषत्वानें सांगितलेलें आहे. पहिल्या पांच वर्षांत रस्ते बांधणीवर १४¾ कोटि रुपये खर्च करण्याचें मुंबई सरकारनें योजिलें असून यापुढील दहा वर्षांत त्यांवर २९¾ कोटि रुपये खर्च व्हावयाचे आहेत. कांहीं रस्त्यांची रुंदी वाढविण्याची योजनाहि त्यांत अंतर्भूत आहे. सध्याच्या व नियोजित रस्त्यांच्या लांबींतील फरकावरून ह्यासंबंधांतील घडामोडीची कल्पना येईल:—

| | सध्याचे रस्ते ( मैल ) | नवे रस्ते ( मैल ) |
|---|---|---|
| राष्ट्रीय महत्त्वाचे | २,७०० | ...... |
| प्रांतिक | २,५०० | ३,१०० |
| जिल्ह्यांतील महत्त्वाचे | ३,००० | ३,००० |
| जिल्ह्यांतील ( दुय्यम ) | २,२५० | ७,७५० |
| खेडेगावी | ( माहीत नाहीं ) | १४,४०० ( नवे-जुने मिळून ) |

शेतीविषयक कार्यक्रमांत संशोधनास मानाचें स्थान आहे. गहूं, बाजरी, तांदूळ, ज्वारी, इत्यादींमध्यें सुधारणा घडवून आणण्याचें दृष्टीनें संशोधन चालविण्याकरितां १९ संशोधन केंद्रें स्थापण्यांत येणार आहेत. पिकांवरील रोगांच्या प्रतिबंधाचाहि विचार केला जाईल. संशोधनाचा फायदा खेड्यापाड्यांपर्यंत पोचावा, ह्यासाठी प्रचारहि हातीं घ्यावा लागेल.

ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट सध्या १६ तालुक्यांत व पेट्यांत लागू आहे तो पुढें सर्व प्रांतास लागू करण्यांत येईल व ४२ नवीं बोर्डें लवकरच स्थापन केलीं जातील. वर निर्दिष्ट केलेल्या नऊ निवडक जिल्ह्यांतच तीं प्रथम स्थापलीं जातील. ह्या ठिकाणीं सहकारी संघटनेचा प्रसार होणें क्रमप्राप्तच ठरतें. शेतकऱ्यांस पिकांसाठी लागणारें भांडवल शक्य तों सहकारी पतपेढ्यांनींच पुरवावें, हें तत्त्व सरकारनें मान्य केलें आहे. सहाजिकच, सोसायट्यांची संख्या व त्यांचे समासद हीं वाढलीं पाहिजेत व देखरेखीची व्यवस्थाहि बळकट केली पाहिजे. पिकें काढणें व त्यांची विक्री करणें ह्यांची सांखळी जोडणें आवश्यक आहे. त्या करितां सहकारी विक्रीच्या संस्थांचें प्रांतभर जाळें निर्माण करण्याचा सरकारचा विचार आहे. शेतकऱ्यांच्या जनावरांचें आरोग्य राखण्यासाठी व्हेटरनरी खात्यांतील नोकरवर्ग वाढविण्यांत येणार आहे. जनतेचें आरोग्य सुधारण्यासाठी जादा डॉक्टरांची आवश्यकता आहे. त्यासाठी पुणें व अहमदाबाद येथील बी. जे. मेडिकल स्कूलसचें कॉलेजांत रूपांतर करण्यांत येईल. खेडेगावांत काम करणाऱ्या आणखी १०० डॉक्टरांना सरकार मदत देईल. जिल्हानिहाय व तालुकानिहाय इस्पितळें काढून मुंबई–पुण्याच्या इस्पितळांतील गर्दी कमी करण्यांत येईल. मोटार वहातुकीचें महत्त्व ज्यास्तच वाढणार, ह्या दृष्टीनें मोठ्या बस कंपन्यांच्या स्थापनेस व व्यवहारांस उत्तेजन दिलें जाईल. सबंध प्रांतभर स्वस्त व मुबलक विजेचा पुरवठा करण्याची योजनाहि सरकापुढें आहे. खतांचा पुरवठा, फळें व भाज्या ह्यांच्या लागवडीस उत्तेजन, चांगल्या जनावरांच्या अवलादींची वाढ, नवीन उपक्रमांची सहकारी संघटनेमार्फत व्यवस्था, जंगलवाढ, सार्वजनिक आरोग्यसुधारणा, कारखान्यांतील कामगारांच्या सुखसोईकडे लक्ष, शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ग्रामसुधारणा केंद्रें, पाण्यानें जमीन धुवून जाऊं नये ह्यासाठी व्यवस्था, जमिनींचे तुकडे पडूं न देण्यासाठी सोसायट्यांची स्थापना, नर्सेसच्या संख्येंत वाढ, नव्या योजनेसाठी लागणाऱ्या इमारतींची ७ कोटि रुपये खर्चून व्यवस्था, इत्यादि अनेक खर्चाच्या बाबी सरकारच्या योजनेंत आहेत.

वरील सर्व कार्यक्रम चालू करण्यासाठीं सरकारास हजारो लोक नेमावे लागतील. युद्धसमाप्तीनंतर परतणाऱ्या सैनिकांना अर्थातच त्यांत प्राधान्य मिळेल व ते आणि इतर पुनः नेहमींच्या जीवनांत समरस होऊं शकतील. ह्या सर्व योजना अमलांत आणून यशस्वी करण्यासाठी अतिशय मोठ्या खर्चाची जबाबदारी मुंबई सरकारावर येणार आहे. १९४४–४५ अखेर त्याच्या युद्धोत्तर पुनर्रचना फंडांत ७ कोटि रुपये साठतील, तेवढ्यानें भागणार नाहीं. नवीन कर बसवावे लागतील व कर्जेंहि काढणें जरूर पडेल. पहिल्या पांच वर्षांतील कार्यक्रमासाठी ५० कोटींच्या खर्चाची तरतूद करावी लागेल. त्यापैकीं उपलब्ध होईल तेवढ्या रकमेंत व मिळूं शकतील तेवढ्या माणसांचे सहायानें कार्यक्रमास प्रारंभ होईल. मुंबई सरकारनें आखलेल्या ह्या योजनेचें वस्तुस्थितींत रूपांतर कितपत होतें, हें पुढें दिसेलच. "पुढें परिस्थिति बदलली, सरकारांत बदल झाला, तरी आजच्या सरकारनें युद्धोत्तर धोरण आतांच आखून ठेवलें नाहीं तर निष्कारण वेळ वाया घालविल्यासारखें होईल व संधि दवडली जाईल" असें सरकारनें आपल्या योजनेच्या प्रारंभींच म्हणून ठेवलेलें आहे. चांगल्या योजनांचें सातत्य कायम टिकण्यावरच त्यांचें यश अवलंबून असतें. दारूबंदीच्या, कॉंग्रेस सरकारच्या धोरणाचा पुरस्कार प्रस्तुत सरकारच्या योजनेंत केलेला असता, तर ह्या नव्या योजनेस व्यापक मान्यता मिळण्यास आणखी सहाय झालें असतें.

## भोर स्टेट बँक लि., भोर

बँका व पेढ्या जे व्यवहार करतात त्या तऱ्हेचे सर्व प्रकारचे नवे-जुने बँकिंगचे व्यवहार अद्यावत् पद्धतीनें करून, विशेषतः भोर संस्थान व लगतचा प्रदेश यांतील जनतेला पैशाचे व्यवहार काटकसरीनें व उपयुक्त रीतीनें करण्याची सवय लावून व्यापार व उद्योगधंद्यांची वाढ होण्यास भांडवल पुरविणें आणि नवीन व्यवसाय व व्यावसायिक निर्माण करण्यास प्रत्यक्ष सहाय्य करणें हें ह्या बँकेचें उद्दिष्ट आहे. बँकेच्या संचालक मंडळाचे एकंदर नऊ सभासद राहतील. त्यांपैकीं पांच श्रीमंत राजेसाहेब भोर हे संस्थानचे वतीनें म्हणून नेमतील व बाकीचे चार सभासद भागीदारांच्या तर्फे निवडण्यांत येतील. भागीदारांच्या तर्फे नेमावयाचे पहिले सभासद नेमण्याचा अधिकार कंपनीच्या आर्टिकल्सचें कलम नंबर १०४ प्रमाणें, श्रीमंत राजेसाहेबांना देण्यांत आलेला आहे. त्याचप्रमाणें संचालक मंडळाचे अध्यक्ष नेमण्याचा अधिकार ऑर्टिकल्सचें कलम नंबर १०३ क प्रमाणें श्रीमंत राजेसाहेब यांचेकडेच राखून ठेवण्यांत आलेला आहे. तूर्त विक्रीस काढलेल्या भांडवलापैकी एक लक्ष पंचवीस हजार रुपयांचे शेअर्स भोर दरबार स्वतः घेणार असून एकूण खपलेल्या भरपाई भांडवलावर पहिली पांच वर्षेपर्यंत दरबारकडून दरसाल दर शेंकडा तीन टक्के प्रमाणें व्याजाची हमी देण्यांत आली आहे. दरबार स्वतःची कमींत कमी दहा हजार रुपये तरी बँकेच्या चालू खात्यांत ठेव ठेवणार असून बँकेची पत केव्हांहि कायम टिकविण्याच्या दृष्टीनें बँकेस जरूर लागेल तेव्हां वर नमूद केलेल्या हुजूर हुकुमाप्रमाणें दरबारकडून रकमेचें सहाय्य होणार आहे. तसेंच सोय होईल त्याप्रमाणें दरबारकडून बँकेस, दरबारचे तिजोरीचे एजंट म्हणून हक्क देण्याचा विचार जरूर तर पुढें करणेंत येणार आहे. बँकेचे दोन हजार शेअर्स (भाग) खपल्यावरच बँकेच्या व्यवहारास सुरुवात होईल. भागीदारांतर्फेच्या संचालकांनीं कंपनीचे किमान २॥ हजार रुपयांचे भाग घेतले पाहिजेत.

अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपये असून तें प्रत्येकीं ५० रु. प्रमाणें १० हजार भागांत विभागलेले आहेत. २॥ लक्ष रुपयांचें भांडवल तूर्त विक्रीकरितां काढलें आहे. भोर संस्थानचे ॲक्टिंग दिवाण रावसाहेब रानडे हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. वा. पुं. वर्दे (आर. आर. नावर आणि कं.) हे उपाध्यक्ष आहेत. संचालक मंडळांत श्री. ल. र. साने, श्री. ग. भै. साठे, श्री. ल. रा. मोडक, श्री. शं. ना. करपे, श्री. म. त्र्यं. शिंगरे, श्री. वि. वि. वावडेकर, व श्री. व. वि. लोणकर (शेअर व स्टॉक ब्रोकर्स) हे मंडळी आहेत. महाराष्ट्र बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेचे पूर्वीचे एजंट श्री. एस. व्ही. काळे ह्यांची मॅनेजर म्हणून नेमणूक झाली आहे. बँकेच्या कामास ता. १९ रोजीं प्रारंभ झाला.

# स्फुट विचार

### विश्वविद्यालयांचें ध्येय

मुंबई विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभाचे प्रसंगीं गेल्या आठवड्यांत उपकुलगुरु, श्री. वाडिया, ह्यांनीं विश्वविद्यालयीन शिक्षणासंबंधानें भाषण केलें तें बरेंच विचारप्रवर्तक होतें. असल्या भाषणांत नवीन कल्पना किंवा योजना फारशा आढळत नाहींत असा सामान्य अनुभव आहे. परंतु सध्याचा काळ पुनर्घटनेच्या विचारांचा आहे आणि त्यांच्या कक्षेंतून उच्च शिक्षण निसटूं शकत नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां श्री. वाडिया ह्यांचे कांहीं उद्गार मननीय होते असें म्हटलें पाहिजे. त्यांनीं विश्वविद्यालयीन शिक्षणाची एखादी नवी योजना पुढें मांडली अशांतला प्रकार नसला तरी कित्येक गोष्टी त्यांनीं सुस्पष्ट केल्या ह्यांत शंका नाहीं. शिक्षणाचे उद्देश आणि पद्धति ह्यांचे विषयीं पुनर्घटनात्मक चर्चा चालली आहे तिचा उल्लेख करून श्री. वाडिया म्हणाले कीं, सत्याचा शोध हा जो विश्वविद्यालयीन शिक्षणाचा मुख्य हेतु आहे तो सारखा डोळ्यांपुढें ठेवून कार्य करीत रहाण्याची प्रथा मुंबई विश्वविद्यालय चालू ठेवील. मानवी ज्ञानाच्या मर्यादा विस्तृत व्हाव्या ह्या उद्देशानें विद्यार्थ्यांनीं प्रयोग, विचार व कल्पकता ह्यांच्या सहाय्यानें झटलें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. वैद्य, वकील व एंजिनिअर तयार करण्याच्या सवलती विश्वविद्यालय देतें, पण हे व असले दुसरे व्यवसाय शिकवणें हें त्याचें खरें कार्य नव्हे; निरनिराळ्या धंद्यांची पार्श्वभूमि, त्यांच्या मुळाशीं असलेली संस्कृति आणि त्यांचें मानवी जीवितांतलें उपयुक्त स्थान ह्यांची कल्पना देणें ही त्याची कामगिरी होय. भौतिक व सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासास मुंबई विश्वविद्यालयांत अधिकाधिक उत्तेजन देण्यांत येत आहे, तें ह्यासाठींच होय, असें स्पष्टीकरण त्यांनीं केलें. समता, स्वातंत्र्य, सहिष्णुता, नागरिकत्व, परोपकार, एकराष्ट्रीयत्व इत्यादि तत्त्वांविषयीं तरुण पिढींत आस्था निर्माण करणें हें ध्येय प्रत्येक विश्वविद्यालयानें जगाच्या पुनर्घटनेंत साध्य होईल असा प्रयत्न चालू ठेवला पाहिजे असा आपला अभिप्राय त्यांनीं पुढें मांडला. हे त्यांचे विचार सर्वसंमत होतील असेच आहेत.

---

### शिक्षण आणि व्यावहारिक जीवन

उच्च ध्येयांचें व सात्विक भावनांचें विद्यार्थ्यांच्या मनांत बीजारोपण करणें हें विश्वविद्यालयीन शिक्षणाचें मुख्य कार्य आहे. तथापि, समाजाची आर्थिक घटना अशी असावी कीं सुशिक्षित लोकांस आपल्या ध्येयांस, नागरिक ह्या नात्यानें योग्य व्यावहारिक स्वरूप देण्यास संधि मिळाली पाहिजे. म्हणजेच, देशांत उद्योगधंदे व व्यापार ह्यांचा प्रगतिपर विकास होऊन नागरिकांस आपलें जीवन सुखानें कंठतां आलें पाहिजे. ध्येयवादी आणि सुशील अशा तरुण पिढींत स्वतःच्या चरितार्थाचीं साधनें उपलब्ध करून घेण्याची पात्रता असणें अगत्याचें आहे. श्री. वाडिया ह्यांनीं आपल्या भाषणांत असें प्रतिपादिलें कीं विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाचा विकास व्हावा आणि त्याचबरोबर आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव त्यांचेमध्यें जागृत व्हावी हा दुहेरी हेतु विश्वविद्यालयांसारख्या शिक्षणास वाहिलेल्या संस्थांनीं स्वतःच्या मनांत बाळगावा. हें सूत्र जगभर मान्यता पावलें आहे आणि तें हिंदुस्थानास इतर देशांप्रमाणें लागू आहे. युद्धजन्य परिस्थितींत आणि युद्धोत्तर व्हावयाच्या जागतिक पुनर्घटनेंत ह्या तत्त्वाची अंमलबजावणी कशी करावयाची हा व्यावहारिक प्रश्न येथें उद्भवतो आणि त्याचा विचार श्री. वाडिया ह्यांच्या भाषणांत ओघानें येणें प्राप्तच होतें. विश्वविद्यालयीन शिक्षण घेणारांची संख्या झपाट्यानें वाढत आहे आणि त्यांची पुरेशी सोय आजहि होऊं शकत नाहीं हा मुंबईचा अनुभव ताजा असल्यानें हिंदी शिक्षण व्यवस्थेंत योग्य सुधारणा व प्रगति केली जाण्याच्या प्रश्नाचा त्यांनीं उल्लेख केला. युद्धसमाप्तीनंतर जीवनकलह भयंकर होईल आणि त्यास तोंड देण्याची शक्ति हिंदी तरुणांत उत्पन्न करण्याची जबाबदारी सर्व विचारी लोकांस भेडसावीत आहे. विश्वविद्यालयांमधून हजारों पदवीधर बाहेर पडत आहेत आणि त्यांची मामुली पांढरपेशा व्यवसायांत खेचाखेच चालली आहे. ह्या सुशिक्षितांच्या वाढत्या संख्येच्या पोटापाण्याची तजवीज युद्धसमाप्तीनंतर कशी होणार ही काळजी उत्पन्न करणारी गोष्ट आहे. हा शिक्षणविषयक प्रश्न विश्वविद्यालयांच्या कक्षेबाहेरचा आहे आणि सरकारनें यांत्रिक व धंद्यांच्या शिक्षणाची तजवीज करून तो सोडवला पाहिजे असें श्री. वाडिया ह्यांनीं सुचवलें आहे. उद्योगधंदे व व्यापार ह्यांची अभिवृद्धि आणि व्यावहारिक व यांत्रिक शिक्षण ह्यांचा निकट संबंध आहे आणि युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेंत शिक्षणाच्या प्रश्नास योग्य स्थान दिलें जाण्याचें महत्त्व त्यांच्या भाषणावरून सिद्ध होत आहे. मि. सार्जंट ह्यांच्या सुप्रसिद्ध शिक्षणविषयक रिपोर्टांत यांत्रिक शिक्षणाच्या हायस्कुलांची तरतूद आहे. तिच्याविषयीं त्यांनीं पसंति दर्शविली. देशाच्या आर्थिक अभिवृद्धीबरोबर धंदेशिक्षणानें वाकबगार झालेल्या तरुणांस वाढती मागणी येईल. ह्याकरितां औद्योगिक प्रगति आणि धंदेशिक्षणाची तरतूद ह्यांची सांगड घालण्यांत आली पाहिजे.

---

### हिंदी रेलवेजच्या उत्पन्नाची चढती कमान

युद्धपरिस्थितिजन्य वाढती वहातूक आणि तिचे चढीचे दर ह्यांचेयोगानें हिंदी रेलवेजच्या उत्पन्नाचे आकडे फुगत चालले आहेत. ह्या वाढत्या उत्पन्नांतून मध्यवर्ती सरकारास अधिक मोठा हिस्सा मिळत आहे आणि जनतेकडून यावयाच्या कराच्या उत्पन्नाचा तो त्या प्रमाणांत जागा घेत आहे. हिंदुस्थान सरकारच्या हिशेबाची छाननी करण्यासाठीं मध्यवर्ती कायदेमंडळानें निवडलेली उपसमिति आहे. तिच्या १९४२-४३ सालांतल्या उत्पन्न खर्चाच्या छाननींत असें दिसून आलें आहे कीं त्या वर्षांत रेलवेजच्या उत्पन्नानें उच्चांक गाठला. उत्पन्न १५५ कोटि रुपये आणि खर्च वजा जाऊन राहिलेला ४५ कोटींचा वाढावा हे आकडे हिंदी रेलवेजच्या इतिहासांत अपूर्व असेच होते. पण १९४३-४४ सालांत ह्या आकड्यांनीं आणखी उंच उडी मारली असून तें रेकॉर्ड मोडलें आहे. उत्पन्न व वाढावा ह्यांचे ह्या वर्षांतले आकडे अनुक्रमें करून १८४ व ५० कोटि असे आहेत. हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींत रेल्वेजच्या वाढाव्यांतील हिश्शानें ह्या दोन वर्षांत २० आणि ३७ कोटि रुपयांची भर घातली. वाढलेल्या उत्पन्नाचा विनियोग रेल्वेजनीं हिंदुस्थान सरकारच्या मागील देण्याची संपूर्ण फेड करण्याकडे केला आहे. त्यांची स्थिति असमाधानकारक व तुटीची होती, तेव्हां धंद्यांच्या कालांत, रेल्वेजना

मध्यवर्ति तिजोरीस द्यावयाचा वार्षिक हिस्सा आणि घसाऱ्याच्या गंगाजळींत टाकावयाच्या रकमा ह्यांची व्यवस्था करतां आली नाहीं. ह्या बाबतींतले थकलेलें देणें आतां पूर्णपणें रेल्वेजनीं देऊन टाकलें आहे, एवढेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या गंगाजळींत नऊ कोटि रुपये टाकले आहेत. येथें दोन गोष्टी लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. रेल्वेजची भरभराट हा युद्धजन्य परिस्थितीचा व देशाच्या युद्धप्रयत्नाचा परिणाम असून हिंदी जनतेचा स्वार्थत्याग बऱ्याच अंशीं त्याच्या मुळाशीं आहे. दुसरें असें कीं, युद्धपरिस्थितींत रेल्वेजची होणारी झीज भरून काढण्यास पुढें कोटचेंवधि रुपयांचा मोठा खर्च आवश्यक होईल.

## सर्व आघाड्यांवर शत्रूची पीछेहाट

युरोपचा आपला किल्ला अभेद्य असल्याच्या घमेंडींत त्यावर हल्ला चढवण्याचें आव्हान जर्मनी मित्रराष्ट्रांस चढेलपणानें देत असे. आपण पादाक्रांत केलेल्या पश्चिम युरोपचा किनारा एवढा बंदिस्त आहे की त्यावर पाऊल ठेवण्याची इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या फौजांची छाती होणार नाहीं अशा वल्गना शत्रू करीत असे आणि त्यांच्या पुष्ट्यर्थ डीएपच्या अनुभवाकडे बोट दाखवीत असे. जर्मनीच्या ह्या बढायांचा फोलपणा उघड होण्यासारख्या घटना आतां युरोपिअन समरांगणावर घडून आल्या आहेत. नॉर्मंडी व ब्रिटनी ह्या फ्रेंच प्रांतांतून ब्रिटिश व अमेरिकन सैन्यें शत्रूचा तीव्र प्रतिकार मोडून काढून पुढें जात आहेत आणि त्यांच्या तोफांचा गडगडाट प्रत्यक्ष पॅरिसमध्यें ऐकूं येऊं लागला असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. ही दुसरी युरोपिअन आघाडी यशस्वी रीतीनें लढवली जात असतांच तिसरी आघाडी फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावर नुकतीच चालू करण्यांत आली आहे आणि तिचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य जर्मन लष्करांत उरलें नसल्याचें प्रत्ययास आलें आहे. दक्षिणेस इटलींत मित्र राष्ट्रांच्या फौजा हळूहळू पुढें सरकतच आहेत आणि पूर्वेच्या आघाडीवर जर्मनीस सारखी माघार घेणें भाग पडत आहे. रशियन सैन्य आतां प्रशियाच्या सरहद्दीपर्यंत येऊन थडकलें आहे आणि प्रत्यक्ष जर्मन भूमीस त्यानें धोका उत्पन्न केला आहे. ह्या रीतीनें जर्मनीस आपल्या संपुष्टांत येणाऱ्या लढाऊ सामर्थ्याची चार निरनिराळ्या आघाड्यांवर वाटणी करावी लागली आहे आणि ह्या प्रत्येक क्षेत्रांत नुकसान सोसून पाऊल मागें घेणें प्राप्त झालें आहे. जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या सर्व देशांत स्थानिक बंडाळ्या माजल्या आहेत आणि त्यांचें मित्र राष्ट्रांस चांगलें सहाय्य मिळत आहे. हिटलरच्या गळ्याभोवतालची तात अधिक अधिक घट्ट आवळली जात आहे हें ताज्या युद्धवार्तांवरून स्पष्ट होत आहे. जपानची पॅसिफिक महासागरांत व ब्रह्मदेशांत अशीच अवस्था हळूहळू होऊं लागली आहे. हिंदुस्थानच्या सरहद्दीवरून जपानी सैन्याची हकालपट्टी झाली आहे आणि ब्रह्मदेशांतहि शत्रूस पराभवाचे धक्के बसत आहेत. जपानभोंवतालच्या बेटांत अमेरिका क्रमाक्रमानें आपलीं ठाणीं बसवीत आहे आणि शत्रूच्या वर्चस्वाभोंवतीं फास आवळीत आहे. युद्धाच्या आघाड्यांकडे दृष्टि फेकली असतां प्रत्येक लढाऊ क्षेत्रांत मित्रराष्ट्रांच्या सरशीस निश्चितपणा व उठावदारपणा अधिकाधिक प्राप्त होत असल्याचें स्पष्ट दिसून येतें.

## धंदेवाले, शास्त्रीय संशोधन व मुंबई विश्वविद्यालय

आधुनिक पद्धतीच्या धंद्यांत यांत्रिक व शास्त्रीय स्वरूपाच्या सुधारणा सारख्या कराव्या लागतात. नवीन तऱ्हेचीं व अधिक कार्यक्षम यंत्रें कारखान्यांत बसवणें, कच्च्या मालाच्या व इतर साधनांच्या वापरांत बचत करणें, उत्पादन अधिक परिणामकारक बनवणें आणि उत्पादन खर्च कमी करून पक्क्या मालांत सुबकपणा वाढवणें ह्या गोष्टींकडे कारखानदारांनीं लक्ष न पुरवल्यास त्यांस बाहेरील स्पर्धेशीं टक्कर देतां येत नाहीं. प्रगतिपर धंदेवाल्यांचें धोरण आपल्या कारखान्यांत सुधारणा घडवून आणण्याचें असतें आणि त्यासाठीं शास्त्रीय संशोधनाची आवश्यकता असते. कित्येक मोठे कारखानदार स्वतःच्या खर्चानें आपल्या कारखान्यांत शास्त्रज्ञ नेमून त्यांचेकडून सुधारणेविषयींच्या सूचना घेतात आणि त्यांचा उपयोग करतात. हें शक्य नसल्यास कारखानदार सहकार्यानें आपल्या मंडळांच्या मार्फत संशोधनकार्य करवतात आणि त्याचा फायदा सर्वांस मिळतो. ह्या कामीं धंदेवाले आणि विश्वविद्यालयें व प्रयोगशाळा ह्यांचें सहकार्य विशेष इष्ट ठरतें. ह्या शिक्षण संस्थांत निरनिराळ्या भौतिक शास्त्रांत संशोधन चाललेलें असतें आणि धंदेवाल्यांच्या अडचणी व त्यांचे प्रश्न त्यांतील तज्ज्ञांस हाताळणें सोयीचें असतें. ह्या दृष्टीनें पहातां मुंबईच्या गिरणीवाल्यांनीं प्रांतिक विश्वविद्यालयाच्या औद्योगिक शाखेस चार लक्ष रुपयांची देणगी शास्त्रीय संशोधन व शिक्षण ह्यांच्या उत्तेजनार्थ दिली आहे तिचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. सेनेटच्या गेल्या सभेमध्यें ह्या देणगीचा स्वीकार करण्यांत आला. त्याच सभेंत कै. वा. नारायणराव देसाई टोपीवाला ह्यांच्या नांवानें देण्यांत आलेली सवा लक्ष रुपयांची देणगीहि स्वीकारली गेली. औषधीय धंद्यांतलें शास्त्रीय संशोधन हा या देणगीचा उद्देश आहे. हिंदी धंद्यांची प्रगति आणि विश्वविद्यालयीन शास्त्रीय संशोधन ह्यांच्या निकट परस्पर संबंधाची जाणीव ह्या देणग्यांत प्रतिबिंबित होत आहे ती त्या देणारांस भूषणावह आहे आणि आमच्या उच्च शिक्षणाच्या प्रगतीचें समाधानकारक चिन्ह आहे. मुंबई विश्वविद्यालयास एक लक्ष रुपयांची तिसरी देणगी हिंदी शेतीच्या आर्थिक संशोधनासाठी मिळाली आहे, तिचाहि स्वीकार सेनेटनें गेल्या सभेंत केला. ह्या विषयाच्या अभ्यासाचें महत्त्व किती आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. शेतीच्या पद्धतींतील सुधारणांचे बाबतींत संशोधन इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या विद्यमानें चाललें आहे. तथापि शेतीच्या धंद्याची आर्थिक बाजूहि बळकट केली जाणें अगत्याचें असून त्याबाबतच्या संशोधनास उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. वरील नवीन देणगीचा उपक्रम ह्या दृष्टीनें स्वागतार्ह आहे आणि ह्या कार्यासाठीं अधिक देणग्यांची आवश्यकता आहे.

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि.

वरील बँकेचा ३० जून, १९४४ चा सातवा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यावरून बँकेच्या उत्कृष्ट प्रगतीची कल्पना येते. एका वर्षांत बँकेचें खेळतें भांडवल १४ लक्ष, १९ हजार रुपयांवरून २६ लक्ष, ३७ हजार रुपयांवर गेलें. बँकेचा नफाहि १९ हजारांच्या दुप्पट झाला आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें धारवाड व नांदगड येथें शाखा व बेळगांव कँप व ठळकवाडी येथें स्थानिक कचेऱ्या उघडल्या. बँकेच्या ताळेबंदावरून, तिनें ६॥ लक्ष रुपये रोख व बँकांत, ५ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत ठेवून १४ लक्ष रुपये कर्जांत गुंतविलेले आहेत. बँकेकडे ठेवी २४¾ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें २३ जुलै १९४४ च्या आपल्या ठरावानुसार आपलें भांडवल १० लाखांपर्यंत वाढविण्याचें ठरविलें आहे व तूर्त ३ लाखांचे भाग विक्रीस काढले आहेत. प्रत्येक जुने भागीदारास प्रत्येक भागास एक नवा भाग मागण्याचा अधिकार आहे. बँकेनें गेल्या वर्षीच्या नफ्यावर ६% कर माफ डिव्हिडंड देण्याचें योजिलें आहे. आपलें स्वतःचें भांडवल वाढवून तें एकूण खेळत्या भांडवलाशीं प्रमाणबद्ध करण्याचें चालकांचें धोरण योग्य आहे व बँकेचे भाग खपून जातील अशी अपेक्षा आहे.

## इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचें अंतरंग

### हिंदुस्थान सरकारचें धोरण

१४ मे, १९४४ रोजीं हिंदुस्थान सरकारच्या पुरवठा खात्याच्या सभासदानें हिंदुस्थानांत दरसाल ३,६०,००० टन सल्फेट ऑफ अमोनिया उत्पादन करण्याची सरकारी योजना जाहीर केली. हें उत्पादन सरकारी नियंत्रणाखालीं रहाणार आहे. योजना पार पाडण्यासाठीं इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. च्या तज्ञांचें सहाय घेण्यांत येत आहे. हा निर्णय जाहीर करण्यापूर्वी सरकारनें हिंदी लोकांचा सल्ला घेतलेला नाहीं व युद्धजन्य तातडीची सबब असली, तरी ह्या अपूर्व घटनेचा अर्थ विशेषत्वानें लोकांच्या नजरेस येणें आवश्यक आहे. इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. चा आंतल्या दारानें होत असलेला हा प्रवेश हिंदी औद्योगिक प्रगतीस पोषक कितपत होईल, ब्रिटिश हितसंबंधांची मुहूर्तमेढ कशी रोवली जात आहे, वगैरे मुद्दे येथें उपस्थित होतात. ह्या दृष्टीनें इं. के. इं. लि. चा इतिहास व तिचें अंतरंग वाचकांस उद्बोधक वाटेल. सर प. जिनवाला ह्यांच्या ताज्या पुस्तिकेवर खालील माहिती आधारलेली आहे.

गेल्या महायुद्धाचे पूर्वी व तें युद्ध चालू असतांहि अमोनिया व चिलियन नैट्रेट ह्यांचा उपपदार्थ म्हणूनच नैट्रोजनचें उत्पादन होत असें; जर्मनींत मात्र कृत्रिम पद्धति योजण्यांत आलेली होती. गेल्या महायुद्धाच्या पहिल्या दोन्ही वर्षांत सल्फेट ऑफ अमोनियाची ( ज्यांत दारूगोळ्याच्या बनावटीसाठीं लागणाऱ्या स्फोटक द्रव्यांच्या उत्पादनास आवश्यक असलेलीं नैट्रोजन व सल्फ्यूरिक ॲसिड हीं असतात ) ग्रेट ब्रिटनमधून मोठ्या प्रमाणावर निर्गत झाली. पुढें चिलीमधून नैट्रेट व इटलींतून व अमेरिकेंतून गंधकाची आयात कमी होऊन दारूगोळ्याच्या उत्पादनास अडचण भासूं लागली. कृत्रिम रीतीनें अमोनिया तयार करण्याचा एक कारखाना बिलिंघॅम येथें उभारण्याचें ब्रिटिश सरकारनें मे, १९१८ मध्यें ( युद्धसमाप्तीच्या आधीं सहा महिने ) ठरविलें, त्याच्या खर्चासाठीं पार्लमेंटनें ५० लक्ष पौंड मंजूर केले. परंतु, लवकरच तह होऊन योजना स्थगित झाली. ब्रूमर मॉंड आणि कं. च्या एका दुय्यम कंपनीनें बिलिंघॅम येथील सर्व प्रकरण १० लक्ष पौंडांस विकत घेतलें. सिंथेटिक अमोनिया अँड नैट्रेट्स लि. ची नंतर स्थापना झाली, तिचें भांडवल १० लक्ष पौंड ठरविण्यांत आलें. ह्या कंपनीवर नेहमी ब्रिटिश ताबा पाहिजे, डायरेक्टर हे जन्मानें ब्रिटिश पाहिजेत व पहिले डायरेक्टर सरकारनें मान्य केलेले असले पाहिजेत, असें त्यावेळीं सरकारशीं झालेल्या करारांत नमूद होतें. १९२१ सालीं कंपनी दररोज २ टन अमोनिया तयार करूं लागली. १९२५ मध्यें त्याची उत्पादनशक्ति २० हजार टन झाली व १९३५ मध्यें ती २,६०,००० टनांवर गेली. १९२६ च्या सुमारास इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. ची स्थापना होऊन तिनें सिंथेटिक अमोनिया अँड नायट्रेट्स लि. ला आत्मसात् केलें. १९३६ मध्यें तिचें भांडवल ७ कोटि, ८० लक्ष पौंड होतें !

ब्रिटिश सरकार आणि इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. ह्यांचा अति निकट संबंध आहे. बिलिंघॅम येथील कारखाना वाढविण्यासाठीं सरकारनें १९२५ सालीं सिं. अ. अँड ना. लि. ला २० लक्ष पौंड देण्याची हमी घेतली. १९२७ सालीं इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. ला कोळशापासून पेट्रोल काढण्यासाठीं सरकारी मदत मिळाली. १९३५ सालानंतर ह्या पेट्रोलचें उत्पादन पुष्कळच वाढलें आहे व त्यास सरकारचें सहाय झालें असेलच. पूर्वीच्या नोबल इंडस्ट्रीज लि. ला इं. के. इं. लि. नें आत्मसात केलें असल्यानें, लष्करी व औद्योगिक उपयोगाच्या स्फोटक द्रव्यांच्या उत्पादनाची त्या कंपनीला मोनॉपली मिळाल्यासारखीच आहे. त्या कारणानें कंपनीच्या उत्पादनाच्या उठावाचा व किंमतींचा प्रश्नच येत नाहीं व ग्रेट ब्रिटनमधील ही सवलत त्या कंपनीस सबंद ब्रिटिश साम्राज्यभर एकमेवाद्वितीय अधिकाराची भूमिका प्राप्त करून देते.

हिंदुस्थानांत स्फोटक द्रव्यें तयार करण्याचें काम एकट्या सरकारनें आपल्या स्वतःकडे ठेवलें आहे. तत्त्व ह्या दृष्टीनें हें ठीक आहे, पण प्रत्यक्ष व्यवहार तसा घडत नाहीं. स्फोटक द्रव्यांच्या उत्पादनास लागणारीं कित्येक द्रव्यें ग्रेट ब्रिटनमधून आणावीं लागतात व त्यासाठीं इं. के. लि. वर सरकार अवलंबून रहातें. सरकारी कारखान्यांतील सर्व महत्त्वाचीं खातीं ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हातांत व सक्त देखरेखीखालीं असतात, त्या कारणानें तेथें काम करणाऱ्या लायक हिंदी रसायन शास्त्रज्ञांना सुद्धां स्फोटक द्रव्यांच्या उत्पादनाची पुरी क्रिया समजूं शकत नाहीं. सरकारनें सर्व स्फोटक द्रव्यांचे कारखाने आज आपणा स्वतःकडे ठेवले असले, तरी कांहीं आवश्यक पदार्थांचे कारखाने काढण्याची कंपनीची तयारी होती. हे कारखाने निघाले, तर काटकसरीच्या सबबीवर दारूगोळा तयार करण्याचें काम सरकार कंपनीकडे पुढेंमागें सोपविणें अशक्य नाहीं. इं. के. इं. लि. चें स्वरूप कदाचित् " स्वदेशी " करण्यांत येईल. कांहीं हिंदी डायरेक्टरहि तिचें बोर्ड भूषवतील, परंतु खरी सत्ता ब्रिटिशेतर हातीं जाऊं देण्यांत येणार नाहीं. अशा रीतीनें, लष्करी स्फोटक पदार्थांचें उत्पादन, हिंदुस्थानास थोडेंफार राजकीय स्वातंत्र्य मिळालें तरी, आपल्या हातांत येणार नाहीं, असा सर पद्मजी ह्यांचा विश्वास आहे.

इं. के. इं. लि. ला ब्रिटिश सरकारनें अत्यंत सढळ हातानें संरक्षण दिलेलें आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील अमोनिया व इतर स्फोटक पदार्थांच्या कंपन्यांत तिला निर्णायक हात आहे. युद्धापूर्वी, आंतरराष्ट्रीय नैट्रोजन कार्टेल स्थापण्यांत कंपनीनें पुढाकार घेतला व निर्गत व्यापाराचा तिनें भला मोठा हिस्सा उचलला. सल्फेट ऑफ अमोनियाच्या ब्रिटिश निर्गतीच्या २०% हिस्सा हिंदुस्थानांत येतो, ह्यावरून हिंदी नैट्रोजन धंद्यांत इं. के. इं. चा हितसंबंध कसा आहे हें दिसून येतें. कित्येक उपपदार्थ व दुय्यम पदार्थ ह्यांच्या उत्पादनांत व व्यापारांत कंपनीचा हात आहे. तिच्या कारखान्यांस दरसाल १५ लक्ष टन कोळसा लागतो ! ह्या कोळशापासून मुख्यतः हैड्रोजन वनस्पतिजांत घेतो व त्यामुळें जळणांत बचत होते. पंजाबमध्यें कंपनीनें हातपाय पसरण्यास प्रारंभ केला आहे, हें प्रसिद्धच आहे.

सल्फेट ऑफ अमोनियाच्या विक्रीसाठीं कंपनीनें ब्रिटिश सल्फेट ऑफ अमोनिया फेडरेशन स्थापन केली आहे. ह्या फेडरेशननें सल्फेटचे जागतिक भाव ठरवून टाकले आहेत. प्रत्येक देशांतील स्थानिक स्पर्धा लक्षांत घेऊनच ते निश्चित केलेले आहेत. त्या कारणानें, हिंदुस्थानांतील विक्रीची किंमत ज्यास्त असली तरी हिंदी उत्पादकास त्यापासून फायदा नाहीं; त्यास वाजवीक बरोबरची किंमतच मिळणार !

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा वर्ख चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा वर्ख चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.

मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

---

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे

( सरकार खात्यानें मान्यता दिलेले )

**टोमॅटो केचप ( गोड ) व**

**टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**

बिझिनेस ऑफिसः १११ अ सदाशिव, पुणें २.

---

पुण्यांतील

**आदर्श निवासस्थान व भोजनालय**

**छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस**

बुधवार चौक, पुणें २.

---

प्रगतिपथावरील नवा

**मैलाचा — दगड**

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०७ टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या. —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

---

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

---

Telephone 779




TELEGRAM Guest House Poona 2.

**पुना गेस्ट हाऊस**

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व ग. आनन्द वामन कार्वे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, ट. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.